जनसंपर्क कक्ष
25 JUL 2025 सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठ उपकेंद्रासाठी खानापूर येथे पाहणी

■ सकाळ वृत्तसेवा

विटा, ता. २४ : शिवाजी विद्यापीठाचे उपकेंद्र येत्या काही दिवसांत सुरू करण्यासाठी विद्यापीठ समितीचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील यांच्यासह समिती सदस्य ॲड. वैभव पाटील, सदस्या प्राचार्या डॉ. मेघा गुळवणी, प्रा. डॉ. रघुनाथ ढमकले, व्यवस्थापन परिषद सदस्य स्वागत परूळेकर यांच्यासह शिवाजी विद्यापीठ सिनेट सदस्य डॉ. निवास वरेकर व पदाधिकाऱ्यांनी खानापूर येथील चार ठिकाणी इमारतींची पाहणी केली.

शिवाजी विद्यापीठ उपकेंद्रासाठी खानापूर शहरातील संपतराव माने महाविद्यालय, रयत शिक्षण संस्था संचलित शोभादेवी पवार ज्युनिअर कॉलेज व ॲपेक्स पब्लिक स्कूल या चार शाळांच्या इमारतींची समितीने प्रत्यक्ष पाहणी केली. दरम्यान, इमारती पाहणीचा अहवाल २५ जुलै रोजी समिती विद्यापीठात सादर करून विद्यार्थी, पालक, प्रशासन यांना सोयीस्कर असलेल्या इमारतीची निवड करून जुलैअखेर शिवाजी विद्यापीठाचे उपकेंद्र या ठिकाणी निश्चितच सुरू होईल, अशी ग्वाही समितीने दिल्याची माहिती ॲड. वैभव पाटील यांनी दिली.

## उपकेंद्रासाठी मदत करण्यास तयार : पाटील

■ शिवाजी विद्यापीठ उपकेंद्र समितीला सुरू शैक्षणिक वर्षात खानापूर येथे उपकेंद्र सुरू होण्यासाठी लागेल ती मदत करू. दुष्काळी भागात शिक्षणाचे माहेरघर बनवण्यासाठी आम्ही सदैव तत्पर राहू, अशी ग्वाही ॲड. वैभव पाटील यांनी सदस्यांच्या स्वागत समारंभात दिली.

